साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. १३ ऑक्टोबर २०२५ * पाने-४ * २/-₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ३१,६२८ कोटींचे पॅकेज - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, (जि.मा.का.बीड):- राज्यात यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. यामध्ये २९ जिल्हे प्रभावित झाले आहेत. या जिल्ह्यांतील नुकसानग्रस्त २५३ तालुके आणि २०५९ मंडळांमध्ये मदतीसाठी ६५ मिलीमिटर पावसाची अट न ठेवता शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नुकसानग्रस्त भागातील बळीराजाला पुन्हा उभे करण्यासाठी ३१ हजार ६२८ कोटींच्या मदतीचे पॅकेज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. या पॅकेजनुसार कोरडवाहू शेतीसाठी प्रति हेक्टरी १८ हजार ५०० रुपये, हंगामी बागायतीसाठी २७ हजार रुपये तर बागायतीसाठी प्रति हेक्टरी ३२ हजार ५०० रुपये मदत दिली जाणार आहे. जाहीर करण्यात आलेली मदत दिवाळीपूर्वी देण्याचा प्रयत्न राहणार असून ही आतापर्यंतची सर्वात मोठी आर्थिक मदत असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

नुकत्याच झालेलया मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी देऊ केलेल्या मदतीची माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, मुख्य सचिव राजेशकुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, कृषी विभागाचे



अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अतिवृष्टीमुळे शेती आणि शेतकऱ्यांसह पिके, जनावरे, गोठे, दुकाने, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही जणांचे मृत्यूही झाले आहेत. मंत्रिमंडळातील सदस्यांनी काही ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करुन नुकसानग्रस्तांना तातडीची १० हजार रुपयांची मदत, गहू, तांदूळ आदी देण्यात आले. यासाठी २२०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता तातडीने मंजूर करण्यात आला. विमाधारक शेतकऱ्यांना लवकर मदत मिळवून देण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान स्वत: प्रयत्न करीत असून विमाधारकांव्यतिरिक्त इतर शेतकऱ्यांनाही १७ हजार रुपये प्रति हेक्टरी इतकी रक्कम दिली जाणार आहे. या भरपाईसाठी १८ हजार कोटींहून अधिकची तरतूद केली जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**असे आहे पॅकेज-** मृतांच्या कुटुंबीयांना: ४ लाख प्रत्येकी, जखमी व्यक्तींना : ७४ हजार रुपये ते २.५ लाख रुपये, घरगुती भांडे, वस्तूंचे नुकसान: पाच हजार रुपये प्रति कुटुंब, कपडे, वस्तूंचे नुकसान: पाच हजार रुपये प्रतिकुटुंब, दुकानदार, टपरीधारक: ५० हजार रुपये, डोंगरी भागात पडझड, नष्ट पक्क्या घरांना : एक लाख २० हजार रुपये, डोंगरी भागात पडझड, नष्ट कच्च्या घरांना : एक लाख ३० हजार रुपये, अंशतः पडझड: ६,५०० रुपये, झोपड्या: आठ हजार रुपये, जनावरांचे गोठे: तीन हजार रुपये, दुधाळ जनावरे: ३७,५०० रुपये, ओढकाम करणारी जनावरे: ३२ हजार रुपये, कुक्कुटपालन: १०० रुपये प्रति कोंबडी. निकषापेक्षा अधिकची मदत देण्यासाठी १० हजार कोटी रुपये अतिरिक्त, खरडून गेलेल्या जमिनीसाठी ४७ हजार रुपये प्रति हेक्टर थेट मदत आणि मनरेगाअंतर्गत तीन लाख रुपये प्रतिहेक्टर, खचलेली किंवा बाधित विहीर: ३० हजार रुपये प्रति विहीर, तातडीच्या मदतीसाठी १५०० कोटी रुपये जिल्हा नियोजन निधीमध्ये राखीव.****

## परळी पंचायत समितीच्या सदस्य पदाच्या आरक्षणाची सोमवारी सोडत

परळी (बातमीदार):- परळी पंचायत समितीच्या सदस्य पदाच्या आरक्षणाची सोडत सोमवारी (दि.१३) होणार आहे.

येथील तहसील कार्यालयात दुपारी एक वाजता ही सोडत होणार आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी व इतर अधिकारी उपस्थित राहणार आहेत. आरक्षण सोडतीवेळी परळी तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन तहसील कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे. ***



परळी वैजनाथ :- येथील थर्मल परिसरातील छत्रपती संभाजीराजे चौकात छत्रपती संभाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्यात आला आहे. ज्येष्ठ नेते तुळशीराम पवार, ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे, जालिंदर नाईकवाडे, महेंद्र रोडे आदी मान्यवरांनी पुतळयाला पुष्पहार घालून अभिवादन केले.

## १३ ऑक्टोबर रोजी बांधकाम कामगारांचा तालुका सुविधा केंद्रावर मोर्चा-प्रा.बी.जी.खाडे

परळी वैजनाथ (बातमीदार):- बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने परळी तालुका सुविधा केंद्रावर बांधकाम कामगारांना दिवाळीसाठी१५००० (पंधरा हजार) बोनस द्या या प्रमुख मागणीसाठी १३ ऑक्टोबर रोजी मोर्चा काढण्यात येणार आहे. गेल्या वर्षी कामगारमंत्री सुरेश खाडे यांनी बांधकाम कामगारांना पाच हजार रु. बोनस जाहीर करूनही दिला नव्हता. सन २०२४-२५ वी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मिळावी, लाभांच्या रकमा तात्काळ बांधकाम कामगारांना मिळव्यात, नोटरी स्वयं घोषणापत्राच्या आधारावर बांधकाम कामगारांची नोंदणी करावी, बांधकाम कामगार ज्या ठिकाणी काम करतो तेथील प्रमाणपत्राच्या आधारे नोंदणी



व्हावी- बांधकाम कामगारांना भांडे सेट ताबडतोब वाटप करावेत , मोबाईल क्रमांक बदल, आधार कार्डात बदल, मुलांच्या नावात बदल इत्यादी सुविधा केंद्रावरच व्हावीत आदी मागण्यांसाठी मोर्चाचे आयोजन केलै आहे. मोर्चा १३ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता बांधकाम कामगार संघटनेच्या कार्यालया पासून निघून मोंढा, बसस्टँड शिवाजी चौक मार्गे जलालपूर भागातील सुविधा केंद्रावर निघेल.बांधकाम कामगारांनी मोठया संख्येने सामील व्हावे असे आवाहान संघटनेचे अध्यक्ष प्रा. बी.जी. खाडे, प्रकाश वाघमारे शेख जावेद,जालिंदर गिरी, नवीद मोजेन, बाबासाहेब रोडे, शेख फेरोज आदींनी केले आहे. ***

## इटके कॉर्नर परिसरातील चौकात खड्ड्यांचे साम्राज्य-ॲड.मनोज संकाये

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहरातील इटके कॉर्नर परिसरात नुकताच उभारण्यात आलेला छत्रपती संभाजी महाराज चौक सध्या खड्ड्यांच्या साम्राज्यात



बदलला आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून, वाहनधारकांनाही अपघातांचा धोका निर्माण झाला आहे.

या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत ॲड. मनोज संकाये यांनी राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन चौकातील खड्डे त्वरित बुजवावेत, अशी मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की,

शहरातील प्रमुख चौक असूनही येथील रस्त्यांची दयनीय अवस्था प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे प्रतीक आहे. या संदर्भात वेळोवेळी राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांना निवेदने आणि प्रत्यक्ष भेटून समस्या सांगितली परंतु त्यांनी मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यावर धूळ साठली आहे.त्यांची नियमितपणे स्वच्छता होत नाही. त्याचबरोबर या मार्गावर रहदारी जास्त आहे. मुख्य रस्ता असल्याने या मार्गावर शक्ती कुंज वसाहतीमध्ये मुलांच्या शाळा आहेत. थर्मल पावर स्टेशनचे कर्मचारी यात मार्गाचा येण्या जाण्यासाठी वापर करतात. त्यामुळे येथे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.याचा परिणाम म्हणून अनेक वाहनधारक आणि नागरिकांना नाहक त्रास भोगाव लागत आहे. त्वरित उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला आहे. ***

## प्रभाग रचना आक्षेपाचे निकाल मिळालेच नाहीत - बहादूरभाई यांचा आरोप

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी नगरपालिका प्रभाग रचनेसंदर्भात विहीत नमुन्यात काँग्रेसच्या वतीने आक्षेप अर्ज दाखल केलेले होते.या आक्षेप अर्जाबाबतचा निकाल काय आहे ते न कळवता परळी नगरपालिकेने प्रभागांची आरक्षण सोडत जाहिर केलेली असुन नगरपालिका मुख्याधिकार्यांनी आक्षेप प्रभाग रचना अर्जाबाबतच्या निकालाची प्रत द्यावी अशी मागणी करत याबाबत कायदेशिर दाद मागणार असल्याचे काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई यांनी सांगितले.

प्रभाग रचनेबाबत काँग्रेसच्या वतीने पक्षाच्या वतीने विहीत नमुन्यात



आक्षेप नोंदविण्यात आला होता त्यानुसार दि.४ सप्टेंबर रोजी सुनावणी घेण्यात आली होती परंतु त्या सुनावणीचा निकाल आपल्या नगरपालिका कार्यलयाकडून अध्याप मिळालेले नाहीत.यातच दि.८ ऑक्टोबर रोजी प्रभाग आरक्षण सोडत करण्यात आली.जाणुन बुजून निकाल न कळवता प्रभाग आरक्षण सोडत घेत एकप्रकारे हुकुमशाही सुरु केली आहे.आक्षेप नोंदवलेल्या प्रभागात दुरुस्ती झाली की नाही प्रभाग रचना कश्या प्रकारे आहे ते प्रसिध्द न करता प्रभाग आरक्षण सोडत जाहिर करणे बेकायेदेशीर असुन लोकशाहीच्या विरुद्ध आहे.आम्ही नोंदवलेले आक्षेप अर्ज जर निकाली काढले असतील तर त्याची नक्कल द्यावी अशी मागणी करून याबाबत कायेदेशीर कार्यवाही करणार असल्याचे काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई यांनी सांगितले. ***

# ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने मौजे बोरखेड व तेलसमुख येथे पुरग्रस्त शेतकऱ्यांना किराणा किटचे वाटप

परळी वैजनाथ (बातमीदार):- शेतकरी राबराब राबतात, शेतात घाम गाळतात आणि त्यानंतर त्यांनी पिकवलेले अन्नधान्य जगाला जगवते, म्हणूनच त्याला जगाचा पोशिंदा म्हटले जाते. मीही आयुष्याची एवढी वर्षे शेतकऱ्यांनी पिकवलेले अन्नधान्य खाल्ले आहे. या ऋणातून उतराई होण्यासाठी मी उरलेले आयुष्य खर्च करणार असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी काम करणार असल्याचे प्रतिपादन ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी केले. परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे बोरखेड तसेच तेलसमुख येथे पुरपरिस्थितीमुळे नुकसान झालेल्या शेतकरी कुटूंबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले, याप्रसंगी ते बोलत होते.



परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे बोरखेड तसेच तेलसमुख येथे पुरग्रस्त शेतकरी कुटूंबांना ग्लोबल विकास ट्रस्टकडून किराण किटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी दोन्हीही गावातील शेकडो नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थितीती होती. परंपारीक शेतीत बदल करून कुठेतरी आता शाश्वत शेतीकडे वळण्याची गरज निर्माण झालेली आहे. सोयाबीन, कापूस, ऊस आदी पिके ही घ्यायची म्हणून शेतकरी घेतात, मात्र हिशोब केला तर त्यातून कवडीचेही उत्पन्न मिळत नाही. वर्षानुवर्षे तोट्यातील शेतकरी कर्जाच्या अगदी खाईत जात आहेत. त्यावर उपाय म्हणून केळी, अंबा, सिताफळ, तुती अशा पिकांकडे शेतकऱ्यांनी वळले पाहीजे. ग्लोबल विकास ट्रस्टकडून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना फळबाग लागवडीबाबत मोफत प्रशिक्षण देण्यात येते. आजघडीला जवळपास ३० हजार पेक्षा जास्त शेतकरी ग्लोबल विकास ट्रस्टसोबत जोडल्या गेलेले आहेत. त्या सर्व शेतकऱ्यांच्या कुटूंबाची अर्थव्यवस्था पूर्वीपेक्षा जास्त सुधारली असून, आज ते समाधानी जीवन जगत आहेत. येणाऱ्या काळात फळपिक लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना आवश्यक असलेली सर्वतोपरी मदत करण्याचा आमचा संकल्प असून, शेतकऱ्यांनी सिरसाळा येथील कृषीकूलमध्ये यावे. तेथील उपलब्ध सर्व बाबींचा अभ्यास करावा आणि येणाऱ्या काळात फायदा करून घ्यावा असे आवहान ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

**३ हजारपेक्षा जास्त शेतकरी कुटूंबांना किराणा किटचा मिळतोय लाभ!** ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. शेतातील पिके वाहून गेली, पिकांसोबत शेतातील मातीही वाहून गेल्याने पुढील किमान तीन वर्षे त्या शेतीतून उत्पन्न मिळू शकणार नाही. अशा अवस्थेत शेतकऱ्यांनी जगायचे कसे? असाच मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. खूप काही नाही, परंतू दसरा आणि दिवाळी सण तरी त्यांना आनंदात साजरे करता यावेत या हेतून ग्लोबल विकास ट्रस्टकडून मदतीचा हात पुढे करण्यात आलेला आहे. २२ प्रकारच्या जीवनावश्यक वस्तू असलेल्या तीन हजारपेक्षा जास्त किराणा किटचे १६ गावांमध्ये वाटप करण्यात येत आहे. ⁂

## विक्रम चहाचे संस्थापक रमेशभाई पटेल (भाईश्री) यांचा वाढदिवस साजरा



परळी वैजनाथ, (बातमीदार):- विक्रम चहाचे संस्थापक रमेशभाई पटेल (भाईश्री) यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त दि. ७ ऑक्टोबर २०२५ रोजी घाटनादूर येथील गुरुदास सेवा आश्रम (वृद्धाश्रम) येथे ७६ ब्लँकेट वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. दूरदृष्टी, कष्टशील वृत्ती आणि सेवाभावामुळे विक्रम चहा घराघरात पोहोचला आहे. आपले संपूर्ण जीवन हे अनेकांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ ठरले आहे असे उदगार यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. सदरील ब्लँकेट वाटप कार्यक्रम लालाजी महाराज आणि प्रभाकर हजारे यांच्या हस्ते पार पडला.

याप्रसंगी संतोष खेडकर, गोपाळ कंकाळ, विरभद्र जवादे उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन विक्रम चहाचे वितरक संजय सेवलकर यांनी केले. ***

## बीड जिल्ह्यात अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी पंचनामे सुरू; व्हायरल झालेली गावांची यादी अधिकृत नसल्याचे प्रशासनाचे स्पष्टीकरण


बीड (जिमाका):- बीड जिल्ह्यामध्ये माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांचे शेतीपिक नुकसानीचे संयुक्त पंचनामे करण्याची कार्यवाही तालुका स्तरावर सुरू असून पंचनामे पूर्ण झाल्यानंतर शासनास निधी मागणी जिल्हा प्रशासनाच्या वतीने तात्काळ करण्यात येईल, याची आवश्यक खबरदारी प्रशासनाकडून घेण्यात येत आहे.

दरम्यान, समाजमाध्यमांवर बीड जिल्ह्यातील माहे सप्टेंबर, २०२५ मधील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या ३०४ गावांची यादी व्हायरल होत असल्याचे प्रशासनाच्या निर्दशनास आले आहे. सदर यादी प्रशासनामार्फत तयार केलेली नाही. या यादी बाहेरील गावांमध्ये नुकसान झालेले नाही, असा चुकीचा संदेश समाजमाध्यमातून प्रसारित होत आहे.

त्यामुळे याद्वारे सर्वसामान्य नागरिकांना स्पष्ट करण्यात येते की, व्हायरल होत असलेली यादी अधिकृत नसून प्रशासनाने ती जारी केलेली नाही. पंचनामे अद्याप सुरू असून नुकसानीबाबतची माहिती शासनास योग्य मार्गाने सादर केली जाईल. नागरिकांनी अशा प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. प्रशासनास सहकार्य करावे व केवळ अधिकृत माध्यमांद्वारेच माहितीचा स्वीकार करावा. जिल्हा प्रशासन आपल्या नागरिकांच्या पाठीशी आहे व शेतकऱ्यांच्या नुकसानीसंदर्भात तातडीने योग्य कार्यवाही करण्यात येत असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. ⁂

**सा.परळी परिसर चे वार्षिक वर्गणीदार व्हा!**
-० अंकासाठी संपर्क ०-
मो.९४२२३२८४९३

**खरय.. पण...**



*आयुष्यात पुढे जायचे असेल तर*
**लाज**
*आणि*
**माज**
*कधीच बाळगू नका...!*

**हसरा कोपरा..!**



दोनच काम आहेत आपल्या देशातील लोकांना..!
एक म्हणजे आधार कार्ड लिंक करणे
दुसरे म्हणजे KYC करणे

देणं ना घेणं आधार कार्ड लिंक करून येणं..

# मराठवाडा साथीचे संपादक सतीश बियाणी यांना परळीकरांच्या वतीने भावपूर्ण अभिवादन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- दैनिक मराठवाडा साथीचे संपादक सतीश शेठ बियाणी यांचे दिनांक १२ सप्टेंबर रोजी निधन झाले होते. त्यांना अभिवादन करण्यासाठी परळी तालुका व शहर पत्रकार संघाच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात परळीकरांनी श्रद्धांजली अर्पण केली.तसेच यावेळी उपस्थित मान्यवरासह अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.



परळी तालुका व शहर पत्रकार संघाच्या वतीने लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे आज मंगळवार दिनांक ७ ऑक्टोबर रोजी दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक स्मृतीशेष सतीश शेठ बियाणी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपाच्या परळी शहराध्यक्ष उमाताई समशेट्टे, नगरसेवक प्रा. पवन मुंडे, शरद पवार राष्ट्रवादी गटाचे नेते एडवोकेट जीवनराव देशमुख, सुरज बियाणी,सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे, दैनिक परळी प्रहार चे संपादक राजेश साबणे, ओमप्रकाश बियाणी, अनिल बियाणी आदी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष स्थानावरून बोलताना रानबा गायकवाड म्हणाले की, दैनिक मराठवाडा साथीने परळी शहरातील अनेक आंदोलनाला पाठबळ दिले. तसेच अनेक कार्यकर्ते आणि नेते तसेच साहित्यिक घडविण्यात दैनिक मराठवाडा साथीचा सिंहाचा वाटा आहे. सतीश बियाणी हे हसतमुख व अजातशत्रू व्यक्तिमत्व होते. त्यांचे परळीकरांचे जिव्हाळ्याचे नाते होते. असेही ते म्हणाले. याप्रसंगी प्रा. पवन मुंडे, सौ उमाताई समशेट्टे, अडवोकेट जीवनराव देशमुख, सुरज बियाणी, अनंत इंगळे, आदींनी सतीश शेठ बियाणी व दैनिक मराठवाडा साथी विषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमास प्रसिद्ध व्यापारी विजय सामत, महेश बँकेचे चेअरमन ओमप्रकाश सारडा, प्रसिद्ध व्यापारी रतनशेठ कोठारी,सामाजिक कार्यकर्ते ह-भ-प रामेश्वर महाराज कोकाटे, धनंजय आढाव,अडवोकेट मनोज संकाये, ज्येष्ठ पत्रकार संजय खाकरे, संपादक ज्ञानोबा सुरवसे, संपादक बालकिशन सोनी, संपादक रामप्रसाद गरड, संपादक मोहन व्हावळे, संपादक बालाजी जगतकर, शिवाजीराव बनसोडे, प्रा. डॉक्टर राजकुमार यल्लावाड, प्राध्यापक कोकलगावे , वंदे मातरम चे दिलीप जोशी,पत्रकार प्रकाश चव्हाण, एडवोकेट अरुण पाठक, प्रा.रविंद्र जोशी, अश्विन मोगरकर,अरुण फुंडकर, सचिन स्वामी,चंद्रशेखर फुटके,विठ्ठलराव झिलमेवाड, मातोश्री ऑफसेटचे विठ्ठलराव साबळे, संतोष जुजगर, बालाजी ढगे, राजकुमार कदम, नरसिंग अनलदास, अंकुशराव जठार मामा, दत्तामामा लांडे, पत्रकार पप्पू कुलकर्णी, संपादक दशरथ रोडे, रवी पतंगे, आनंद हडबे ,दीपक वंजारखेडे, मुद्दसीर शेख, आनंद तुपसमुद्रे यांच्यासह संपादक, पत्रकार शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार धनंजय अरबुने यांनी केले. प्रास्ताविक पत्रकार भगवान साकसमुद्रे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य व्यवस्थापक ओमप्रकाश बुरांडे,पत्रकार भगवान साकसमुद्रे, पत्रकार अनिल गायकवाड, संपादक नितीन ढाकणे, आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सांगता सतीश शेठ बियाणी यांना दोन मिनिटं स्तब्ध राहून आदरांजली वाहून करण्यात आली.⁂

**संपादकीय...**

# येणार नवे कारभारी..!

*** सुविचार ***

**'चिंता' केल्याने बिघडलेल्या गोष्टी चांगल्या होत नाहीत, पण त्यावर ''चिंतन'' केल्याने चांगला मार्ग नक्की सापडतो.!**

या-ना-त्या कारणाने रखडलेल्या राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या यांसह नगरपालिका, नगर पंचायती व महानगर पालिकांच्या निवडणुकांची लगबग राज्यभर सुरू झाली आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अध्यक्ष व सदस्यांच्या निवडीची आरक्षण प्रक्रिया झाली आहे. काहींची होते आहे. विविध पक्ष, संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या दृष्टीने या निवडणुका मोठ्या महत्वाच्या मानल्या जातात. त्यामुळे पक्ष, संघटना व या निवडणुकीसाठी कामाला लागल्या आहेत. ज्या कार्यकर्त्यांना ही निवडणूक लढवायची आहे. त्यांनीही जोरदार तयारी सुरू केली आहे. कार्यकर्त्यांना या निवडणुकीत आपले नेतृत्व विकसित करण्याची संधी असते. म्हणून पक्ष, संघटनेच्या नेत्यांना आपल्यासाठी राबणाऱ्या कार्यकर्त्यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न या निवडणुकीत करावे लागतात. त्यामुळे कार्यकर्त्यांबरोबरच नेत्यांच्या दृष्टीनेही ही निवडणूक तेवढीच महत्वाची मानली जाते.

अलिकडच्या काळात राज्यातील राजकारणाचे समिकरण बदलेले आहे. विविध पक्ष संघटना एकत्र येऊन महायुती, महाआघाड्यांची निर्मिती झाली आहे. महायुती, आघाडी करून या निवडणुका लढवणे हे मात्र नेत्यांची डोकेदुखी ठरणार आहे. उमेदवारांची निवड करताना अनेक चांगल्या कार्यकर्त्यांची संधी हुकणार आहे. त्यामुळे पक्षात, संघटनेत स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा हिरमोड होणार असल्याने ही निवडणूक युती अथवा महाआघाडीकडून न लढवता स्वतंत्रपणे लढवली जावी तशीच भूमिका नेत्यांनी घ्यावी म्हणून कार्यकर्त्यांचा दबाब वाढत आहे. यासाठी पक्षाच्या नेतृत्वाकडे कार्यकर्ते तशी मागणीही करताना दिसत आहेत. युती, आघाडी कडून या निवडणुका लढवल्या गेल्या तर वाट्याला अपुऱ्या जागा येतात. त्यामुळे कार्यकर्ते नाराज होतात. परिणामी या निवडणुका स्वतंत्रपणे लढवण्यावर काही पक्षाचे नेतेही तयार झाले आहेत. परंतु या निवडणुका एकत्र लढवायच्या की स्वतंत्र याबाबत वरिष्ठ पातळीवर विचारमंथन सध्या सुरू आहे.

बीड जिल्ह्यात जिल्हा परिषद तसेच परळी, अंबाजोगाई, माजलगाव, गेवराई, बीड, आष्टी आदी पंचायत समित्यांच्या याशिवाय परळी, अंबाजोगाई, बीड, माजलगाव, गेवराई व धारूर या सहा नगर परिषदांच्या निवडणुका पुढील दोन-तीन महिन्यात होणार आहेत. या निवडणुका येत्या ३१ जानेवारी पूर्वी पार पाडाव्यात असे सक्त आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने प्रशासन या निवडणुकीसाठी जोरदार तयारी करते आहे. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांचे आरक्षण तसेच पंचायत समित्यांच्या सभापती पदांचे आरक्षण प्रक्रिया पार पडली आहे. गेल्या सोमवारी जिल्ह्यातील नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडतही झाली आहे. त्यानंतर बुधवारी नगर पालिकेच्या प्रभागातील आरक्षण सोडत पूर्ण झाली आहे. एक-दोन दिवसात पंचायत समित्यांच्या सदस्यांची आरक्षण सोडत होते आहे. या सोडतीमुळे निवडणुकीसाठी बाशिंग बांधून तयार असलेल्या कार्यकर्त्यांत 'कुठे खुषी तर कुठे गम' वाट्याला आला आहे.

परळी नगर पालिकेचे नगराध्यक्षपद सर्वसाधारण महिला उमेदवारासाठी राखीव झाले आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर नेतृत्व करणाऱ्या विविध पक्षातील नेत्यांचा हिरमोड झाला आहे. परळीत ही निवडणूक महायुतीकडून की स्वतंत्र लढवायची याबाबत भाजप व राष्ट्रवादीकडून अद्याप कोणताही निर्णय झाला नाही. हा निर्णय कधी होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. युती झाल्यास उमेदवार कोण? याचीही मोठी उत्सुकता कार्यकर्त्यांबरोबरच सर्वसामान्यांना आहे. रोज नवी नावे शहरात चर्चीली जात आहेत. उमेदवारी कोणाला द्यायची यासाठी युतीच्या नेत्यांमध्ये परीक्षाच या निमित्ताने होणार आहे. उमेदवारी मागणारे जास्त आणि जागा कमी यामुळे नेत्यांची डोकेदुखी वाढणार आहे. महाविकास आघाडीकडून मात्र ही निवडणूक परळीत आघाडी करूनच लढवण्याची तयारी झाली असल्याचे दिसते आहे. त्या दृष्टीने आघाडीच्या स्थानिक पातळीवरील नेत्यांची बैठकही झाली आहे. याशिवाय वंचित बहुजन आघाडीसह इतर पक्ष संघटनाही या निवडणुकीसाठी तयारीला लागल्या आहेत. परळी पालिकेची निवडणूक कशी होते व कोण बाजी मारतो याकडे परळीकरांचे लक्ष लागले आहे. ***

# विद्यार्थी सहभाग कमी का होतो आणि त्यासाठी शिक्षकांकडून काय उपाययोजना कराव्यात? संकल्पना आणि उपाय

**शिक्षण क्षेत्रात सक्रिय विद्यार्थी सहभागाला फार मोठे महत्त्व आहे. शिक्षक म्हणून आम्हाला माहीत आहे की सहभागाशिवाय विद्यार्थ्यांचा मनोबल, जिज्ञासा आणि शिकण्याचा परिणाम प्रभावित होतो. मात्र अनेक विद्यालयांमध्ये विद्यार्थी वर्गात आवाज उठवण्यापासून, प्रश्न विचारण्यापासून, किंवा चर्चा करण्यापासून मागे हटतात. यामागे विविध कारणे असतात जी शैक्षणिक, सामाजिक, भावनिक आणि सांस्कृतिक अडथळे म्हणून काम करतात. शिक्षकांनी या अडथळ्यांची जाणीव आणि समज असणे आवश्यक आहे, ज्यामुळे ते योग्य उपाययोजना करू शकतील.**

सहभाग कमी होण्याची सामान्य कारणे आणि त्यावर उपाय

**१. चुकीची भीती/चूक होण्याची भीती:-** विद्यार्थ्यांना सार्वजनिकपणे चुकीचे उत्तर दिल्यास शिक्षकांकडून किंवा वर्ग मित्रांकडून टीका होईल, असा धोका वाटतो. त्यातून त्यांचा संवाद, प्रश्न विचारण्याचा आग्रह कमी होतो. उपाय:शिक्षकांनी वर्गात अशा संस्कृतीचे आधिपत्य निर्माण करावे जिथे चुका स्वाभाविक शिकण्याचा भाग मानल्या जातील. सकारात्मक प्रतिक्रिया देऊन तुमचा प्रयत्न उत्कृष्ट आहे असे म्हणणे, विद्यार्थी उत्साहाने सहभागी होतील.

**२. आत्मविश्वासाचा अभाव:-** काही विद्यार्थी त्यांच्या क्षमता बद्दल शंका बाळगतात. आत्मविश्वास नसल्यामुळे ते गप्प राहतात. उपाय: छोटे यश लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले पाहिजे. व्यक्तिच्या छोट्या मोठ्या यशांसह वर्ग मित्रांचा पाठिंबा त्यांना सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करतो.

**३. काहींचे अधिराज्य आणि इतरांचा गप्पपणा:-** बहुतेकवेळा काही बोलके विद्यार्थी चर्चेत प्रभुत्व गाजवतात, इतर शांत विद्यार्थ्यांना संधी मिळत नाही. उपाय: शिक्षकांनी आळीपाळीने बोलणे, जोडीने चर्चा, थिंक-पेअर-शेअर या स्वरूपाच्या व्यावहारिक पद्धती अंगीकाराव्या, ज्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला बोलण्याची संधी मिळेल.

**४. भाषिक व सांस्कृतिक अडथळे:-** विविध भाषिक पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना संवाद करताना अडचण येते.

उपाय: बहुभाषिक संसाधनांचा वापर, चित्र, लेखन व संवाद साध्य करणे, सांस्कृतिक संयोजन व लोककलांची समज विकसित करणे गरजेचे आहे.

**५. अपेक्षा अस्पष्ट असणे:-** विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून काय अपेक्षित आहे याचा पुरेसा निर्देश नसतो. उपाय: शिक्षकांनी सहभाग म्हणजे काय, कोणती वागणूक कशी अपेक्षित आहे, प्रगल्भ उदाहरणे देऊन स्पष्ट करणे आवश्यक आहे.

**६. विषयात रस नसणे:-** अशक्त किंवा कंटाळवाणे वाटणारे विषय विद्यार्थ्यांमध्ये उत्साह कमी करतात. उपाय:विषयाला जीवनाशी जोडून उदाहरणे देणे गरजेचे, जेणेकरून विद्यार्थ्यांना विषयाचे महत्त्व समजेल.

**७. भूतकाळातील नकारात्मक अनुभव:-** पूर्वी केलेल्या चुका, टीका किंवा अपमानामुळे विद्यार्थी पुढील वेळी सहभागी होण्यास भीती बाळगतात. उपाय: सहानुभूतीपूर्ण प्रतिक्रिया, स्नेहपूर्ण वागणूक, आणि प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

**८. वेगवान शिकवणीचा गती:-** अधिक विचार करू शकल्यासाठी वेळ न मिळाल्याने काही विद्यार्थी हळूहळू मागे पडतात.

उपाय: प्रश्नपुच्छन केल्यावर शांतपणे थोडा वेळ देणे, विद्यार्थ्यांना विचार करण्याची संधी देणे.

**९. मतांना महत्त्व न देणे:-** विद्यार्थ्यांच्या मते आदर न मिळाल्यास त्यांचा सहभाग कमी होतो.

उपाय: प्रत्येक विद्यार्थ्याचे विचार कृतज्ञतेने ऐकणे व प्रशंसा करणे यामुळे वर्गातील वातावरण सकारात्मक राहते.

**१०. वैयक्तिक गरजांची पूर्णता नसणे:-** भूक, थकवा, मानसिक ताण यामुळे लक्ष केंद्रित करणे कठीण होते. उपाय: वर्गाची योजना करत असताना उपाहार वेळ, विश्रांती व मानसिक स्वास्थ्य सांभाळणे महत्त्वाचे आहे.

विद्यार्थींचा सहभाग वाढवणे म्हणजे फक्त त्यांना बोलायला म्हणणे नव्हे, तर त्यांना सुरक्षित, समर्थ व प्रेरित वाटण्याची जागा निर्माण करणे आहे. शिक्षकांनी या अडचणींचा शोध घेऊन, सहानुभूतीने व विविध पद्धती वापरून सकारात्मक वातावरण तयार केले तरच मुलांना शिकण्याचा आनंद व सर्जनशीलता वाढेल. शिक्षक म्हणून आपले कर्तव्य आहे की आपण प्रत्येक विद्यार्थ्याला लक्ष देऊन त्यांच्या गरजांप्रमाणे शिक्षकत्व करून, प्रभावी आणि सर्वसमावेशक शिक्षणाची निर्मिती करूया. सहभागी विद्यार्थी म्हणजे घडणाऱ्या समाजात सशक्त नागरिकांची तयार होतील आणि असा वर्ग म्हणजे एक उत्कृष्ट शिक्षणाचे संस्थान असेल. आपल्या सर्व शिक्षक मित्रांनी या दृष्टीने शिक्षणप्रक्रियेतील सहभाग वाढवण्याचा प्रयत्न करावा. हीच खरी शिक्षणाची उंची आहे.



**- अमोल कांबळे**
परळी वैजनाथ

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

* वर्ष ०९ * अंक २३ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. १३ ऑक्टोबर २०२५ * किंमत : २ रू.

# अंबाजोगाई पालिका निवडणुकीत होणार काटेकी टक्कर

अंबाजोगाई (बातमीदार):- अंबाजोगाई नगर परिषद निवडणूक जसजशी जवळ येत आहे तसेच निवडणूकीच्या आख्याड्यात उतरणारे उमेदवार देखील समोर येऊ लागले आहेत. अंबाजोगाई नगर परिषदेत राजकिशोर मोदी हे गेली पंचवीस वर्षे एकहाती सत्ता सांभाळून आहेत. तर मुंदडा कुटुंब हे तितकाच काळ विधानसभेचे मैदान गाजवत आहेत.

बऱ्याच निवडणुकीत मोदी व मुंदडा यांच्यात राजकिय तडजोड होऊन ते आपापली खुर्ची सेफ झोन मध्ये आणत होते. मात्र मागील पंचवार्षिक काळापासून मोदी व मुंदडा यांच्यात मतभेद निर्माण होऊन टोकाचे राजकीय वैमनस्य निर्माण झाले आहे. त्यामुळे मोदी व मुंदडा यांच्याकडून आगामी नगर परिषद निवडणूक ही अत्यंत प्रतिष्ठेची केली जात असल्याचे दिसून येत आहे.

अंबाजोगाई नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी त्यांच्या नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात अंबाजोगाई शहरासाठी अनेक विकासात्मक योजना राबवून अंबाजोगाई शहरातील नागरिकांना मूलभूत सोईसुविधा पुरविण्यात यशस्वी झाले आहेत. त्यांनी नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी, शहरातील स्वच्छता तसेच संपूर्ण शहरात दिवाबत्ती आणि नागरिकांचे सशक्त आरोग्य यावर भर दिला गेला आहे. त्याचबरोबर शहरातील अंतर्गत रस्ते व नाल्या यावर देखील राजकिशोर मोदी यांनी विशेष लक्ष केंद्रित केले होते. त्यामुळे अंबाजोगाई शहरातील नागरिक नगर परिषदेसाठी केवळ राजकिशोर मोदी यांच्याच नावाचा विचार करून त्यांनाच भरभरून मतदानरुपी आशिर्वाद देत असल्याचे दिसून येत होते आणि त्यामुळेच गेली पंचवीस वर्षे राजकिशोर मोदी यांनी अंबाजोगाई नगर परिषदेवर एकहाती सत्ता प्रस्तापित केली होती. शहर स्वच्छतेच्या बाबतीत अंबाजोगाई नगर परिषदेत विविध पुरस्कार मिळवून दिले आहेत. ज्यामध्ये राज्यस्तरीय, विभागीय , जिल्हास्तरीय शासकीय पुरस्कार प्राप्त करण्यात यश मिळवून अंबाजोगाई नगर परिषदेचे नाव महाराष्ट्रभर पोचविले आहे.

तर राजकिशोर मोदी यांच्या विरुद्ध अंबाजोगाई नगर परिषदेची निवडणूक लढविणारे आमदार नमिता मुंदडा यांचे यजमान अक्षय मुंदडा हे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी रणनीती आखत आहेत. राज्याच्या माजी मंत्री स्व विमलताई मुंदडा यांच्या माध्यमातून मुंदडा कुटुंबाने देखील केज विधानसभा मतदारसंघावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. स्वर्गीय विमलताई मुंदडा यांनी देखील केज मतदारसंघात विविध विकासात्मक योजना राबवून मतदारसंघात आपली पकड अबाधीत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी मतदारसंघातील केज आणि अंबाजोगाई शहरात विविध शासकीय कार्यालये स्थापित केली आहेत. अंबाजोगाई च्या स्वा रा ती रुग्णालयास वेळोवेळी भरीव निधी , रुग्णालयासाठी इमारती, यंत्रसामग्री व अन्य बाबींसाठी वारंवार शासनस्तरावर पाठपुरावा करून त्याची पूर्तता केली आहे. स्व विमलताई यांच्या आकस्मिक निधनानंतर त्यांचे यजमान जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, अक्षय मुंदडा व आमदार नमिता मुंदडा यांच्या माध्यमातून मतदारसंघातील विविध कामांच्या माध्यमातून नागरिकांशी आपली नाळ जोडून ठेवली आहे.

मात्र मागील काही वर्षांपासून राजकिशोर मोदी व मुंदडा कुटुंबात राजकिय मतभेद निर्माण होऊन टोकाचे राजकीय वैमनस्य व कटुता निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. या राजकीय वैमनस्यातूनच आमदार नमिता मुंदडा यांचे यजमान अक्षय मुंदडा हे राजकिशोर मोदी यांच्या विरुद्ध अंबाजोगाई नगर परिषदेची नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढविण्यास कार्यकर्त्यांच्या आग्रहा खातर तयार झाल्याची चर्चा अंबाजोगाई शहरात ऐकावयास मिळत आहे. जर राजकिशोर मोदी व अक्षय मुंदडा यांच्यात जर आगामी निवडणूक झाली तर ती एकदम अटीतटीची व काटेकी टक्करच होईल अशी भावना देखील मतदारातून व्यक्त होत आहे. मात्र असे झाले तरी विधानसभेला मुंदडा व नगर परिषदेसाठी मोदी असा अंबाजोगाई शहरातील नागरिकांनी तयार केलेला आलेखीत नियम मागील पंचवीस ते तीस वर्षांपासून आजतागायत चालत आला आहे. यापुढेही अंबाजोगाई शहरातील मतदार तोच आलेखीत नियम पुढे चालू ठेवतात का हे पाहणे औचुख्याचे ठरणार असून मतदार अंबाजोगाई नगराध्यक्ष पदाची माळ कोणाच्या गळ्यात घालणार हे देखील येणारा काळच ठरवणार आहे. ***

# वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी सर्व अवैद्य धंदे तात्काळ बंद करा - राजकुमार डाके

परळी वैजनाथ, (बातमीदार):- शहरातील सावतामाळी मंदीर परिसरात वाढती गुन्हेगारी थांबवण्यासाठी सावता माळी मंदिर परिसरात सुरु असलेले सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करुण या परिसरातील नागरीकांना भयमुक्त करावे अशी मागणी राजकुमार डाके यांच्यासह असंख्य सामाजीक कार्यकर्त्यांच्या वतीने संभाजी नगर पोलीस स्टेशनचे पोलीस नीरीक्षण मा. धनंजय ढोणे साहेब यांना प्रत्यक्ष भेटुन लेखी निवेदणा द्वारे करण्यात आली आहे.

गेल्या अनेक वर्षापासुन सावता माळी मंदीर परिसरातील कीर्ती नगर, कृष्णा नगर, गंगासागर नगर, सिध्देश्वर नगर या परिसरात अवैध धंद्याचा विळखा पडलेला आहे या अवैध धंद्यामुळे भावी पीढी व्यसनाच्या आहारी जाऊन गवैद्य मार्गाला लागत आहे.यातुनच देवीदास शिंदे आत्महत्या प्रकरण, अनेक मुलींना छेडछाड, शालेय विद्यार्थ्यांना मारहान सारखे अनेक गंभीर गुन्हे घडले आहेत. या गुन्हेगारी अपप्रवृत्तीला ना जात पात नसुन हि अपप्रवृत्ती आहे ती आलीकडच्या काळात या परिसरात प्रचंड प्रमाणात वाढलेली दीसत आहे.याच परिसरात अनेक शाळा, कॉलेज, गुरुकुलातुन हजाघरो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत येथील अवैद्य धंद्यामुळे तेथील अनेक विद्यार्थी त्यांच्या लहान वयातच वाईट व्यसनाच्या आहारी जात आहेत यातुन भांडणे, तंटे, वादविवाद, माता भगीणींची छेडछाड आदी प्रकार घडत आहेत. यातुन अनेकांचे संसार ऊद्धवस्त झाले असुन अनेक जणांनी आपले आयुष्य संपवल्याचे हि प्रकार घडले आहेत. लहान लहान मुले गुन्हेगारीकडे वळताना दिसत आहेत यातुन भावीपीढी ऊद्धवस्त होत आहे. हे सर्व प्रकार थांबवण्या साठी तात्काळ कीर्तीनगर, कृष्णानगर, गंगासागर नगर, सिद्धेश्वर नगर सह सावतामाळी मंदिर परिसरातील सर्व अवैद्य धंदे तात्काळ कायमचे बंद करण्याची लेखी मागणी राजकुमार डाके यांच्या वतीने संभाजी नगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा.धनंजय ढोणे साहेब यांच्याकडे करण्यात आली. या निवेदणावर सामाजीक कार्यकर्ते आनंत ईंगळे, योगेश पांडकर, बालासाहेब गायकवाड, भारत ताटे, दत्ता दहिवाळ, महेश बागवाले, सुरेश नानवटे, रामेश्वर फडकरी, अतूल माळी,काशिनाथ शंकुरवार, रविभाऊ मुळे, ऋुशिकेश वानरे, वैजनाथ भोकरे, गणेश महाराज, आशोक महाराज, माधव वानरे, शिवाजी फड, नागनाथ मुंडे, जालींदर फड आदींच्या वतीने देण्यात आले. ***

# धोबी-परीट समाजाला पूर्ववत अनुसूचित जाती प्रवर्गाचे आरक्षण देण्याची मागणी




परळी वैजनाथ (बातमीदार):- धोबी-परीट समाजाला पूर्ववत अनुसूचित जाती प्रवर्गाचे आरक्षण द्या या मागणीचे निवेदन येथील धोबी - परीट समाजाच्या वतीने तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांना देण्यात आले आहे.

धोबी- परीट समाज महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती पूर्वी म्हणजे १९६० मध्ये बुलढाणा व भंडारा जिल्ह्यांमध्ये केंद्र व राज्य सरकारच्या राजपत्रात अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट होता. मात्र महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर शासनाने कोणताही ठोस पुरावा न देता या समाजाला इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गात वर्गीकृत केले.यामुळे धोबी- परीट समाजाला पूर्ववत अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट करण्यात यावे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा धोबी - परीटसमाजाच्या वतीने देण्यात आला आहे. यासंदर्भातील मागणीचे निवेदन येथील धोबी - परीट समाजाच्या आरक्षण समन्वय समितीच्या वतीने तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांना देण्यात आले आहे.**

# तेली समाजाला नगरपालिकेत प्रतिनिधित्व देण्याची तेली समाजाची मागणी

परळी वैजनाथ (बातमीदार):- नगरपालिकेच्या निवडणूकीचे बिगूल वाजायला सुरुवात झाली असून माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे साहेब यांनी तेली समाजाला प्रतिनिधित्व करण्याची संधी देण्याची मागणी तेली समाजातील नागरिकांनी केली आहे. यापूर्वी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली समाजाला प्रतिनिधित्व दिल्याने तेली समाजातील नगरसेवक, तसेच संस्थांवर संचालक निवडून आले होते.

नगरपालिकेच्या निवडणूकीचे बिगूल वाजायला सुरुवात झाली असून नगराध्यक्षपद व नगरसेवकांचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

यामुळे ईच्छूक नगराध्यक्ष व नगरसेवक निवडणूकीच्या तयारीला लागले असून प्रभागात भेटीगाठी सुरू केल्या आहेत. शहरात तेली समाज मोठ्या संख्येने आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या नेतृत्वाखाली समाजाला विविध ठिकाणी प्रतिनिधित्व देण्यात आले होते. यावेळी नगरसेवक निवडून आले होते. तसेच वैद्यनाथ बँकेत स्वर्गीय गोविंद आप्पा व्यवहारे, विठ्ठल आप्पा चौधरी अनेक वर्षे संचालक, व्हाइस चेअरमन होते. गोविंद आप्पा व्यवहारे बीड जिल्हा बँकेवर संचालक होते. विठ्ठल आप्पा चौधरी यांना खादी ग्रामोद्योगवर संधी दिली होती. वर्षा नरेश पिंपळे या नगरसेवक म्हणून निवडून आल्या होत्या. मात्र गेल्या काही वर्षात तेली समाजाला नगरपालिकेत किंवा इतर कुठेही प्रतिनिधित्व देण्यात येत नाही. यामुळे समाजात नाराजी पसरली आहे. आता होणाऱ्या आगामी निवडणुकीत तेली समाजातील नागरिकांना नगरपालिकेत प्रतिनिधित्व देण्यात यावे. तेली समाजाबद्दल स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, जितके साथ तेली वो भाग्यशाली या उक्तीने समाजाला प्रतिनिधित्व देण्यात यावे अशी मागणी समाजाकडून महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, सचिव प्रा मधुकर शिंदे व समाजातील नागरिकांनी मंत्री पंकजा मुंडे व आमदार धनंजय मुंडे साहेब यांच्याकडे करण्यात आली आहे.***

# मी मराठी.. माझी मराठी....

**लाभले भाग्य आम्हा बोलतो मराठी.. हो मराठी भाषकांचं राज्य आणि त्यातली भाषा मराठी' अणि त्याला मिळालेला अभिजात दर्जा या सा-यांचा आपल्यातील प्रत्येकाला अभिमान आहे आणि आता याचा अधिक उत्कर्ष व्हावा यासाठी शासनस्तरांवर देखील मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आहे.**

मुंबई-पुणे सारख्या शहरात शिकलेली मुले ही ग्रामीण भागात शिकलेल्या मुलांपेक्षा सरस ठरतात असं नाही परंतु आपलाकडे इंग्रजीचं जास्त कौतुक झालं आणि इंग्रजी बोलण्यात मेट्रो शहरातील मुले अग्रेसर असल्याने ग्रामीण महाराष्ट्रातील मुलांमध्ये न्यूनगंड अधिक आहे. आणि हाच दूर करण्याचे काम प्राधान्याने मराठीचा वापर वाढविल्याने होणार आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेतला जाणाऱ्या भारतीय प्रशासन सेवा अर्थात आयएएस मध्ये देखील मराठी माध्यमाचा समावेश करण्यात आला आहे. आपण ती परिक्षा तसेच मुलाखत यासाठी मराठी भाषेचा पर्याय निवडावा हे उत्तम. नाना पाटेकरचं एक वाक्य आहे. मला स्वप्न मराठीत पडतात तर मराठीच जवळची त्याप्रमाणे आपली मातृभाषा आपण सर्वत्र वापरावी यातून आपला आत्मविश्वास वाढीला लागेल आणि आपण कोणत्याही क्षेत्रात बाजी मारू शकतो याचीही खात्री बाळगता येईल.

अमृतातेही पैजा जिंके अशी आपली मराठी काळानारूप बदलत आली आहे. इंग्रजीचं कौतूक करणारे देखील कबूल करतील की ऑक्सफर्ड आपल्या शब्दकोषात इतर भाषेचे शब्द स्विकारतो त्यावेळी त्यात मराठीला प्राधान्य आहे. आणि मराठीचे मोठेपण असे की आपणही इतर भाषेतील शब्द मोठया प्रमाणात स्विकारतो अहे की आपणही इतर भाषेतील शब्द मोठ्या प्रमाणात स्विकारतो आणि त्याचा वापर करतो. याने उत्क्रांत होणारी मराठी भाषा दिवसेंदिवस अधिक संपन्न होत आहे. समाजमाध्यमांमध्ये देखील आज मराठीचा सर्वाधिक वापर होतो याचा आपणास अभिमान हवा आणि इंग्रजी शब्दात मराठीचं वेगळेपण मान्य आपल्यातील प्रत्येकाने याचा वापर वाढवला तर मराठीचा प्रचार वेगाने होईल.

**- प्रशांत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड

## दरवळणारा सुगंध...



**मोठ्या लोकांच्या शेजारी उभं राहिलं, म्हणजे आपण मोठे होतो की नाही ते माहित नाही... पण चांगल्या लोकांच्या सोबतीत राहून नक्कीच मोठं होता येतं.**